ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, १ ऑगस्ट, १९७१ | अंक १५


## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवं तसं मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी [illegible]
सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, व्हॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेहि
गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर [illegible] रानोमाळ भटकत असताना
किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसींच्या
सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची
प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल
तर त्यासाठी ठाकरसींच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे
हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरुण कापड, [illegible],
फ्रॉक वगैरेंचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसींचे सुती कापड न चुरगळण्याच्या [illegible] असे '[illegible]'
असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
काउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई – १.

## पाकिस्तानी कंपन्यांचे युद्धात १५ कोटींचे नुकसान

गेल्या डिसेंबरमध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धात भारताच्या आरमाराने कराची बंदरावर साहसी हल्ला करून तेथील पेट्रोलच्या टाक्यांचा फार मोठा संहार केला. त्यामुळे पाकिस्तानला युद्ध चालविणे अशक्य झाले असावे. आता ह्या तर्काला पुष्टी देणारा पुरावा पुढे आला आहे. पाकिस्तानातील ज्या कंपन्यांचे युद्धामुळे नुकसान झाले त्यांनी सरकारकडे युद्धविमा जोखीम पद्धतीप्रमाणे नुकसानभरपाई मागितली आहे. ही रक्कम १५ कोटी रुपयांची असून त्यातील १ कोटीची मागणी एका तेल कंपनीने नोंदविली आहे. गेल्या जूनमध्ये पाकिस्तानचे अर्थमंत्री डॉ. मुबाशीर हसन यांनी अंदाजपत्रकावरील भाषणात असे उद्गार काढले की भारताच्या लष्करी कारवाईमुळे लाखो टन तेलाचा नाश झाला आणि तेलाचे उत्पादन व वाटप ह्यांची व्यवस्थाही पार उधळली गेली. हिंदी आरमाराने कराची बंदरावर लागोपाठ दोन हल्ले करून त्याची वाताहत केली त्याविषयी ही अधिकृत कबुलीच म्हणावी लागेल. हिंदी आरमाराप्रमाणे हिंदी हवाई दलानेही कराची बंदरावर हल्ले चढविले होते. पाकिस्तानच्या युद्धयंत्राचे तेल तोडण्याचाच हवाई दलाचा हेतू होता. शिवाय, हवाई दलाच्या बाँबफेकीने रेल्वेचे दळणवळण बंद पडू लागले होतेच. हल्ले झाल्यानंतर कराचीहून अनेक परदेशीय नागरिक निघून गेले. त्यांनी त्याच वेळी हल्ल्यांचे यश जाहीर केले होते.

## पाकिस्तानशी व्यापार सुरू होण्याची शक्यता

सिमला येथे भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान करार झाल्यानंतर उभयता देशांतील संबंध सुधारू लागतील अशी अशा व्यक्त करण्यात येत आहे. अजून बऱ्याच वादग्रस्त प्रश्नांबद्दल पुरा विचारही व्हायचा आहे. तरी संबंध सुधारण्याचे एक क्षेत्र व्यापार होऊ शकेल. भारताचे परराष्ट्रीय व्यापारमंत्री श्री. एल. एन. मिश्र ह्यांनी उभयता देशांतील व्यापारी संबंध पुन्हा सुरू होण्यास आता संधी असल्याचे मत व्यक्त केले आहे. इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन ट्रेड ह्या संघटनेच्या पदवीदान प्रसंगी बोलताना ते आणखी असे म्हणाले की, नेपाळ, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन ह्या शेजारील देशांशी असलेले व्यापारी व आर्थिक संबंध अधिक वाढविण्यास खूप वाव आहे. त्याचप्रमाणे आग्नेय आशिआतील देश आणि पश्चिम आशिआतील देश ह्यांच्याशीही अधिक घनिष्ट व्यापारी संबंध जोडण्यास भरपूर वाव आहे. ह्याच संदर्भात परदेशाकडून मिळणाऱ्या मदतीचा विचार करण्यात आला पाहिजे. चालू वर्षी भारताला १२५ कोटी डॉलर्सची मदत देण्याच्या जागतिक बँकेच्या सूचनेला भारत मदत संघातील देशांनी पाठिंबा दिलेला आहे. कोणतीही अट न घालता देण्यात आलेल्या मदतीचे स्वागत करण्यात येईल. तथापि, आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारताने स्वतःच्या पायावरच उभे राहिले पाहिजे.



# ☆ अर्थ ☆

बुधवार, २ ऑगस्ट, १९७२





संस्थापक :

प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांनी सावधान राहावे

राष्ट्रीयीकरण झालेल्या १४ व्यापारी बँकांनी आता ४ थ्या वर्षांत प्रवेश केला आहे. राष्ट्रीयीकरण झाल्यापासूनच्या तीन वर्षांच्या अवधीत त्यांच्या परिस्थितीत काय बदल झाला आहे असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. ह्या कालाचा आढावा घेतला तर त्यांनीं कर्जाऊ दिलेल्या रकमेत बरीच वाढ करावी लागेल आणि त्याचबरोबर खर्चात काटकसर करावी लागेल असे दिसते. एरव्ही चालू आर्थिक वर्षात त्यांना वाजवी नफा मिळणे कठीण वाटते. गेल्या तीन वर्षांत कर्जाऊ देण्यात येणाऱ्या रकमेच्या प्रमाणात घट झालेली आहे. राष्ट्रीयीकरणाच्या पहिल्या वर्षात ह्या रकमेत २४·३ टक्क्यांनी वाढ झाली. पण, मे १९७१ पासून १९७२ पर्यंत मात्र ही वाढ १२·१ टक्क्यांपर्यंत खाली आली. ह्याच काळात बँकांकडील ठेवींत मात्र सतत वाढ झालेली दिसते. पहिल्या वर्षी ठेवी १५·३ टक्क्यांनी वाढल्या, दुसऱ्या वर्षी १८·१ टक्क्यांनी वाढल्या आणि तिसऱ्या वर्षी म्हणजे १९७१ च्या मे पासून १९७२ पर्यंत १८·६ टक्क्यांनी वाढल्या. ह्याचा अर्थ असा होतो की बँकांना ठेवीवर व्याज द्यावे लागेल; पण कर्जाऊ दिलेल्या रकमांवरील व्याजाच्या उत्पन्नात मात्र भर पडणार नाही. अर्थातच त्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होईल. कर्जाऊ देण्यात येणाऱ्या रकमा आणि ठेवी ह्यांच्यात सुसंगतपणा राखणारे प्रमाण आवश्यक असते. हे प्रमाण किमान ७५ टक्के असावयास पाहिजे असे तज्ज्ञांचे मत आहे.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झालेल्या पहिल्या वर्षी हे प्रमाण ८१ टक्के होते. दुसऱ्या वर्षी ते घटून १९७०–७१ साली ७७·२ टक्के झाले आणि १९७१ च्या मे पासून १९७२ पर्यंत ते आणखी खाली येऊन ७३·४ टक्के झाले. तथापि निरनिराळ्या बँकांमधील कर्जाऊ दिल्या जाणाऱ्या रकमा आणि ठेवी ह्यांच्यातील वाढीचे चित्र वेगवेगळे आहे. काही मोठ्या बँकांतील ठेवी गेल्या तीन वर्षांत सतत वाढत गेल्या पण त्यामानाने कर्जाऊ रकमेत मात्र वाढ झाली नाही. एका बँकेत तर कर्जाऊ रकमेत १·५ टक्क्यांनी घटच झालेली आहे. काही मोठ्या बँकांनी ग्रामीण भागांत कर्ज देण्यात विशेष पुढाकार घेतला. त्यामुळे त्यांच्या कर्जाऊ रकमांत चांगली वाढ झालेली आहे. पण व्यापारी व औद्योगिक कर्जांत मात्र मंदी दिसून येते. समाजातील आर्थिकदृष्ट्या कमजोर वर्गांना सवलतीच्या दराने कर्ज देण्यास चालू वर्षी प्रारंभ करण्यात आला आहे. त्यामुळे बँकांवर जादा बोजा पडणार आहे. पण हा बोजा बँकांना पेलेल, असे सांगण्यात येत आहे. बँकांच्या नोकरांना देण्यात येणाऱ्या कर्जाऊ रकमेचा खर्च पेलणे मात्र त्यांना जड जाणार आहे. ही कर्जे व्याजमुक्त असतात अगर अत्यल्प व्याजाने दिलेली असतात. बँकांच्या नोकरांना दरसाल सुमारे ७० ते ८० कोटी रुपये कर्जाऊ दिले जातात असा अंदाज करण्यात आलेला आहे.

—

## ब्रिटनच्या विमानप्रदर्शनात हिंदी विमाने

ब्रिटिश एरोस्पेस कंपनी लि. तर्फे ब्रिटनमध्ये एक वर्षाआड विमानांचे प्रदर्शन भरविण्यात येत असते. देशोदेशींची विमाने ह्या प्रदर्शनात भाग घेत असल्याने जगातील विमानांचे ते अद्ययावत दर्शनच ठरते. चालू वर्षी हे प्रदर्शन ४ सप्टेंबरपासून चालू होणार आहे. प्रदर्शनाच्या इतिहासात पहिल्या प्रथमच दोन हिंदी विमाने पाठविण्यात येणार आहेत. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. ह्या बंगलोर येथील कारखान्यात बनविण्यात आलेली दोन 'नॅट' लढाऊ विमाने आणि वैमानिकांना शिक्षण देण्यासाठी वापरण्यात येणारे 'किरण' हे जेट विमान प्रदर्शनात भाग घेतील. 'नॅट' लढाऊ विमानांचे नाव आता भारतातच काय पण जगात मशहूर झालेले आहे. कारण १९६५ च्या भारत पाक युद्धात आणि १९७१ च्या रणसंग्रामात ह्या विमानांनी नेत्रदीपक कामगिरी करून दाखविली आहे. दोन्ही संघर्षांत पाकिस्तानच्या हवाई दलाने अमेरिकेकडून मिळविलेली अत्याधुनिक लढाऊ विमाने वापरली पण त्यांचा फडशा पाडण्याचे काम चिमुकल्या नॅट विमानांनी चोख बजावले. ह्या विमानांत सुधारणा करण्याचे काम सतत चालू असते. त्यामुळे ती मागे पडण्याचे कारण नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २५ वर्षांनी ब्रिटनच्या आकाशात हिंदी विमाने हिंदी वैमानिकांची करामत दाखविणार आहेत. सर्व विमाने सुटी करून ऑगस्टच्या प्रारंभी ब्रिटनला पाठविली जातील.

## रशियाची मदत अधिक होऊ लागली

बांगला देशातील घटनांपासून अमेरिकेने भारताला आर्थिक मदत देण्याचे बंद केले आहे. आता अमेरिकेकडून होणाऱ्या मदतीपैकी बरीच मदत रशियाकडून होऊ लागली आहे. औद्योगिक कच्चा माल, रासायनिक खते, लोहेतर धातू, वृत्तपत्रांचा कागद, रॉकेल, इत्यादी पदार्थांच्या पुरवठ्यात रशियाने वाढ केली आहे. १९७१ च्या मानाने उभयता देशांमधील व्यापारात २५ टक्के वाढ करण्यात येणार आहे.

———

## जागतिक अर्थव्यवस्थेचा विकास : १९१४–१९७०*

अर्थशास्त्रावर आणि भारतीय अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथनिर्मिती मराठी भाषेत तरी फारशी होत नाही; जी पुस्तके तयार झालेली आहेत, त्यांची उपयुक्तता पाठ्यपुस्तकांपेक्षा बहुधा जास्त नसते. बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचे उपप्राचार्य, अर्थशास्त्राचे प्राध्यापक, बँकिंग विभाग प्रमुख, प्रा. प. वि. पटवर्धन, एम. ए., एल एल. बी. ह्यांनी वरील ७०० पृष्ठांचा ग्रंथ लिहिला आहे, तो प्रामुख्याने पुणे व शिवाजी विद्यापीठ यांच्या तृतीय वर्ष बी. कॉम. या परीक्षेच्या 'मॉडर्न इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' ह्या विषयासाठी. बहुतेक पाठ्यपुस्तकात विषयाचे सखोल ज्ञान करून देण्यापेक्षा परीक्षेला उपयोगी पडेल अशा सूत्र पद्धतीनेच बहुधा लिखाण केलेले असते; लेखकाचे स्वतःचे वाचन आणि अभ्यास त्यात प्रतिबिंबित होत नाही. प्रा. पटवर्धन ह्यांनी विशिष्ट अभ्यासक्रम दृष्टीसमोर ठेऊन प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे ह त्यांनी स्वतःच प्रारंभी सांगितले नसते, तर तसे समजलेही नसते, इतकी त्यांची ग्रंथरचना स्वतंत्र आहे. आम्हाला तर असे वाटते की प्रा. पटवर्धनांची मनोरचना विद्वानाची आहे; खपासाठी पाठ्यपुस्तक तयार करण्याची नाही. त्यांच्या ह्या बैठकीमुळेच पुस्तकाचा विस्तार ७०० पृष्ठांपर्यंत झाला आहे आणि प्रत्येक पान माहितीने भरगच्च भरलेले आहे.

भारतासारख्या विकसनशील देशाचे आर्थिक धोरण ठरविताना इतर देशांनी घडवून आणलेल्या विकासाचा अनुभव मार्गदर्शक ठरणार आहे. ऐतिहासिक दृष्टीने त्या अनुभवापासून योग्य निष्कर्ष काढता येऊन, कमीत कमी चुका करून आपणास वाटचाल करता येईल. "विकासाचे अर्थशास्त्र" हे अर्थशास्त्राचे एक नवीन शास्त्रच दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य मिळालेल्या देशांना महत्त्वाचे बनले आहे. आर्थिक विकासाच्या वर्णनात कार्यकारण-मीमांसेला विशेष महत्त्व असते आणि म्हणूनच आर्थिक इतिहासा-पेक्षा विकासाचे अर्थशास्त्र विशद करून सांगणे विशेष तज्ज्ञाचे काम असते. हे काम प्रा. पटवर्धन ह्यांनी आपल्या ग्रंथात उत्कृष्ट रीतीने पार पाडले आहे.

प्रस्तुत ग्रंथात जागतिक अर्थव्यवस्थेचा विकास सांगताना सोव्हिएट युनियन, अमेरिका, इंग्लंड आणि जपान ह्यांच्या विकासाचा तपशील विस्ताराने सांगितला आहे. पहिल्या महायुद्धा-पूर्वीपासून १९७० पर्यंतचा सुमारे ६० वर्षांचा जागतिक अर्थ-व्यवस्थेचा आढावा ह्या ग्रंथात घेण्यात आला आहे. पहिल्या महायुद्धाचे आर्थिक परिणाम लेखकाने वर्णन करून सोव्हिएट युनियनच्या अर्थव्यवस्थेची छाननी केली आहे. युद्धकालीन अर्थव्यवस्थेतून शांततायोग्य अर्थव्यवस्थेकडे होणारी संधि-कालातील वाटचाल आणि त्यामधील समस्यांचा विचार लेखकाने तपशीलवार वर्णिला आहे. आर्थिक पुनरुत्थान, जागतिक मंदीची कारणे, तिची वाटचाल, तिचे आर्थिक परिणाम, आर्थिक पुनरुत्थानासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्न, ही सर्व सांगून मंदीतून तेजीकडे प्रमुख राष्ट्रे कशी गेली, मंदीने कोणते धडे शिकविले, दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अर्थव्यवस्था, पूर्व-पश्चिम दुफळी, संयुक्त राष्ट्रसंघटना, मदत आणि पुनर्रचना, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याच्या विविधशाखा, दुसऱ्या महायुद्धोत्तर अमेरिका, इंग्लंड, जपान, सोव्हिएट युनियन, इत्यादी विषयांवरील प्रकरणांनी ग्रंथाचा पुढील भाग व्यापला आहे. शेवटच्या, ४३ व्या प्रकरणात गेल्या ६० वर्षांच्या काळात जागतिक अर्थव्यवस्था ज्या तीन अवस्थातून गेली, त्यांचा आढावा घेऊन नजीकच्या भविष्यकाळाच्या दृष्टीने जागतिक अर्थविकासाच्या समस्यांच्या उकलेचा परिचय करून देण्यात आला आहे.

गेल्या २०–२५ वर्षात स्वतंत्र झालेल्या, विकसनशील देशांचे आजचे आणि उद्याचे प्रमुख प्रश्न म्हणजे लोकसंख्येची वाढ रोखण्याची आणि अन्नोत्पादनाच्या वाढीची निकड हे होत. त्या प्रश्नांचा उल्लेख लेखकाने ग्रंथाच्या अखेर केला आहे, पण त्याला मार्गदर्शक असे अर्थशास्त्रीय विवेचन ग्रंथात आढळत नाही. विस्तारवादी देशांचेच आंतरराष्ट्रीय अर्थकारणावर अद्याप प्रभुत्व असल्यामुळे त्यांच्याद्वारा होणाऱ्या समस्यांवरच आणि प्रयत्नां-वरच पुस्तकात भर दिलेला आहे; अविकसित देशांच्या दृष्टीने मार्गदर्शक विवेचन ग्रंथात अधिक विस्ताराने असावयास हवे होते. भारताने परराष्ट्रीय मदतीवर अवलंबून न राहण्याचे आपले धोरण आता जाहीर केले आहे. अर्थकारणावर जागतिक राजकारणाचे पडणारे दडपण, लष्करी खर्चाचा विकसनशील देशांच्या विकासावर होणारा प्रतिकूल परिणाम, इत्यादि समस्यांबाबतही ग्रंथात मार्गदर्शन हवे होते. नव्याने स्वतंत्र झालेले सर्व विकसनशील देश समाजवादी बनणे अपरिहार्य आहे; लोकशाही राज्यशासनाने, समाजवादी धोरणे आखून, राष्ट्रीय उत्पन्नात त्वरेने वाढ करण्यातील अडचणी ह्या नव्याच अडचणी आहेत; त्या सोडविताना जुना, वेगळ्या परिस्थितीचा इतिहास कितपत उपयोगी पडेल, ह्याची शंकाच आहे. हा प्रश्न केवळ आर्थिक नसून तो सोडविण्याचे मार्गही केवळ आर्थिक नाहीत. योग्य धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसही त्याला पोषक असा राष्ट्रीय, उत्पादक, दृष्टिकोन नागरिकात असावयास हवा असतो; इतर राष्ट्रांच्या आर्थिक विकासाप्रमाणे तेथील माणसांच्या विकासाचे तुलनात्मक विवेचन करून त्याप्रमाणे माणसे घडविणे, ही भारताची एक फार मोठी गरज आहे. ग्रंथकाराने ह्या सर्व प्रश्नांचा प्रपंच करावयाचा म्हटले, तर त्यासाठी एवढ्याच पृष्ठांचा आणखी एक प्रचंड ग्रंथ लिहावा लागेल! तथापि, ठराविक अभ्यास-क्रमासाठी हा ग्रंथ लिहिलेला असल्यामुळे त्याच्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे; कोणत्या आणखी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे त्याचे हे केवळ दिग्दर्शन आहे.

*लेखक :—प्रा. प. वि. पटवर्धन. प्रकाशक : आयडियल बुकसर्व्हिस, पुणे, किंमत रु. २२

## तरुणींच्या मोहकतेचा येण्यांच्या वसुलासाठी उपयोग

येण्यांच्या वसुलीसाठी पठाणांच्या सारखे राकट, निर्दय, दंडा घेतलेले तगादेदार मुद्दामच नेमण्यात येतात. त्यांची भीती वाटावी हाच त्याचा उद्देश असतो. कापडवाल्यांचा, वाण्यांचा, घरमालकांचा तगादेदार वसुलीसाठी घरी आला म्हणजे कित्येक पुरुष आपल्या पत्नीला किंवा मुलीला पुढे करतात. त्यामुळे तगादेदाराची कठोरता कमी होते.

ह्याच्या उलट, निगरगट्ट देणेकऱ्यांवर आकर्षक, सुबक बांध्याच्या, मोहक आवाजाच्या तगादेदार तरुणींचा वर्षाव केला तर? कर्ज-वसुलीचे काम करणाऱ्या लंडनमधील एका फर्मने आपल्या गिऱ्हाईक कंपन्यांची येणी वसूल करण्यासाठी २० तरुणींची योजना केली आहे. त्यांनी गेल्या दोन वर्षांत किमान २ कोटी रुपयांची येणी वसूल केली आहेत. पुरुष तगादेदारांच्या धाक-दपटशापेक्षा स्त्री-तगादेदारांची कोमलता अधिक परिणामकारक ठरेल, ही त्या फर्मची अपेक्षा खरी ठरली आहे. ह्या मुली देणेकऱ्यांना प्रत्यक्ष जाऊन भेटत नाहीत; त्यांच्याशी स्वतःच्या फर्मच्या कचेरीतूनच फक्त टेलिफोनवरून बोलतात; त्यांच्यावर गोड बोलण्याचा वर्षाव करतात. देणेकरी ह्या मुलींना हॉटेलात भेटण्यासाठी आमंत्रणे देतात, पण मुलींनी ती स्वीकारावयाची नसतात. त्यांनी फक्त आशा लावायची आणि फर्मच्या वसुलीचे काम करावयाचे. सत्वर पैसे देणारांना मुलींचा सहवास उपभोगायला मिळेल, असा त्यांचा समज होऊ दिला जात नाही.

"गुड मॉर्निंग, मिस्टर जोन्स. तब्येत कशी काय आहे? आज छान हवा पडली आहे, नाही? मी फोन कशासाठी केला असेल, ह्याबद्दल आपली काय कल्पना आहे? 'क्ष' कंपनीकडील आपल्या खात्याबद्दल मी आपणाशी बोलू इच्छिते" अशा रीतीने पहिला टेलिफोन केला जातो. आपल्यावर गोड हल्ला चढविला जात आहे, हे देणेकऱ्याच्या लक्षातच येत नाही. त्याला संभाषण बंद करावेसे वाटत नाही; तगादेदार मुलींच्या आवाजाचे आकर्षण त्याला मोहित करते आणि मुलींनाच फोन तोडावा लागतो.

देणेकरी माणूस त्या मुलींना स्वतःच्या अडचणी सांगू लागतो आणि त्याच्या भावनावशतेचा फायदा घेऊन फर्मची मुलगी त्याला म्हणते, "मला तुमच्याबद्दल खूप सहानुभूती वाटते. मी काही करू शकेन का? मी काही मार्ग सुचवू का? दर आठवड्याला अमुक इतकी रक्कम देऊन पैसे फिटले की पुन: नवा प्रारंभ नाही का करता येणार?" देणेकरी पाघळतो आणि मुलींच्यावरील छाप कायम ठेवण्यासाठी पैसे पाठवून देतो!

## वरच्या मजल्याची आठवण राहिली नाही

वरच्या मजल्यावरील खिडकीतून पत्नीला बाहेर फेकून जखमी केल्याबद्दल एका कामगारावर फौजदारी खटला भरण्यात आला. त्याने 'विस्मृती' हे कारण सांगितले. "आम्ही पूर्वी तळमजल्यावर राहात होतो" असे तो म्हणाला. मॅजिस्ट्रेटने हसू आवरले पण त्याला दंड केलाच!

## भांडवल उभारणीसाठी येणारा खर्च

शेअर्स आणि डिबेंचर्सच्या द्वारा भांडवल उभारण्यास एकूण विक्रीस काढलेल्या रोख्यांच्या ५·७% एवढा खर्च १९७१ मध्ये आला; १९७० मध्ये त्याचे प्रमाण ५·२% होते. १९७१ मध्ये २,२६६ लक्ष रु. च्या भांडवल उभारणीस अंडररायटिंग कमिशन, ब्रोकरेज आणि इतर किरकोळ खर्च मिळून १२० लक्ष रुपये खर्च आला. ह्या १२० लक्ष रु. खर्चाची ही ४९·१ लक्ष रु. अंडररायटिंग कमिशन, २९·४ लक्ष रु. ब्रोकरेज आणि ५७·२ लक्ष रु. इतर किरकोळ खर्च (जाहिरात, छपाई, इ.) अशी आहे.

१९६९-७१ : एकूण खर्चाशी % प्रमाण

| वर्ष | ब्रोकरेज | अंडररायटिंग कमिशन | इतर खर्च |
|---|---|---|---|
| १९६९ | १५·९ | ३६·२ | ४७·९ |
| १९७० | २०·९ | ४१·४ | ३७·७ |
| १९७१ | २०·३ | ३५·७ | ४४·० |

## आता सहकार-सप्ताह १४ नोव्हेंबर (पं. नेहरूंचा जन्मदिन) पासून

आजपर्यंत सरकार-सप्ताह नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या शनिवारपासून साजरा होत असे. त्याऐवजी हा सप्ताह असा साजरा केला जावा की, पंडित जवाहरलाल नेहरू यांचा दि. १४ नोव्हेंबर रोजी येणारा जन्मदिन साजरा होईल अशी एक सूचना राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्ष खासदार श्री. आर. जी. तिवारी यांनी काही काळापूर्वी केली होती. त्या सूचनेचे राष्ट्रीय सहकारी संघाच्या सभासद-संस्थांनी उत्साहाने स्वागत केले होते. त्याप्रमाणे राष्ट्रीय सहकारी संघाच्या दि. २८ एप्रिल १९७२ रोजी झालेल्या कार्यकारिणीच्या सभेत सहकारी सप्ताहाची सुरुवात यंदापासून नोव्हेंबरच्या पहिल्या शनिवारपासून न होता पंडित नेहरूंच्या जन्मदिनापासून व्हावी आणि १४ नोव्हेंबर हा दिवस सहकारी कार्यकर्त्यांचा दिवस म्हणून ओळखला जावा असा ठराव मंजूर केला आहे.

## भू-विकास बँकांतर्फे कर्जवसुलीसाठी जप्त्या

जिल्हा भू-विकास बँकांनी १९७१-७२ या वर्षांत शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी २९,८४९ जप्त्या आणल्या.

१९,२३९ शेतकऱ्यांच्या जमिनींचा व मालमत्तेचा लिलाव केला आणि १३,२०० हेक्टर जमीन जप्त केली. यंदा दुष्काळ-ग्रस्त जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ह्या जप्तीतून वगळण्यात आले. सहकार खात्याचे राज्यमंत्री श्री. सुंदरराव सोळंके यांनी ही माहिती नुकतीच विधान सभेत दिली.

### आय. सी. एस. अधिकारी पडद्याआड जाणार

हिंदमधील आय. सी. एस अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षांऐवजी ५८ असे करण्यात आले आहे. त्याचा परिणाम म्हणून राजकारभारातील रंगमंचावरून हे अधिकारी अपेक्षेपेक्षा लवकर पडद्याआड जातील. मध्यवर्ती सरकारात काम करणारे १२ अधिकारी ह्या वर्षी रीतसर सेवानिवृत्त व्हावयाचेच होते. आता सेवानिवृत्तीच्या वयाची मर्यादा खाली आणल्यामुळे भारत सरकार व राज्य सरकार ह्यांच्या खात्यात काम करणारे आणखी बरेच अधिकारी घरी बसतील. ह्याचा अर्थ असा की १९७२ साल हे आय. सी. एस अधिकाऱ्यांची पोलादी चौकट नष्ट झालेली पाहणार. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २५ वर्षे परकीय सरकारने उभारलेली ही नोकरशाही टिकून राहिली होती. अधिकाऱ्यांचा हा वर्ग सर्वसामान्य सरकारी नोकरांपासून अगदी निराळा होता. त्यांच्या हक्कांना व सोयी-सवलतींना खुद्द राज्यघटनेत संरक्षण देण्यात आलेले होते. अलीकडे घटनेत दुरुस्ती करून त्यांचे खास हक्क रद्द ठरविण्यात आले आहे. त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० होते. त्यांची कामे करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आय. ए. एस. अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ ठरविण्यात आलेले आहे. आतापर्यंत अशी पद्धत होती की आय. सी. एस. अधिकाऱ्यांनी सेवानिवृत्त होण्यापूर्वी साठलेली रजा मागावी व सरकारने सार्वजनिक हितासाठी ती नाकारावी. नंतर हे अधिकारी नाकारलेल्या रजेपोटी आपला पगार मागत असत व तो देण्यात येत असे.

---

### वाफेवर चालणारी देशी मोटारगाडी

पेट्रोल अगर डिझेल तेलाच्या इंधनावर चालणाऱ्या मोटारगाड्या विषारी धूर हवेत सोडतात आणि हवा दूषित करतात. परदेशातील व भारतामधील मोठ्या शहरांची हवा आरोग्याला घातक होण्यास मोटारीचा फार मोठा हातभार लागतो. म्हणून वाफेवर चालणाऱ्या मोटारी तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. दिल्ली येथील एका मोटार कारखान्याने वाफेवर चालणारी मोटारगाडी तयार करण्याची उमेद धरली आहे. भारत सरकारकडून कारखान्याला जरूर तो परवाना मिळाला आहे. मोटारीसाठी वापरण्यात येणारा आराखडा आणि कच्चा माल भारतातीलच वापरण्यात येणार आहे. अशा ५० हजार मोटारी दरसाल तयार करण्यात यावयाच्या आहेत. प्राथमिक तयारी सुरू करण्यात आली आहे.

---

### दूषणजन्य विनाश फार लांब नाही

स्टॉकहोम येथे झालेल्या भौतिक दूषणासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगातील नैसर्गिक साधनसामग्रीची बेसुमार उधळपट्टी होत असल्यामुळे लवकरच मानव जातीवर निसर्गाचा प्रकोप होईल असा इशारा देण्यात आला होता. एका शास्त्रज्ञाच्या अंदाजाप्रमाणे १९८२ च्या सुमारास ह्या अरिष्टांची लक्षणे दिसू लागतील. पण त्या वेळी परिस्थिती हाताबाहेर गेलेली असेल. तो म्हणतो की जगाने आपले मार्ग बदलले पाहिजेत. तसे न करणे हे अनैतिक ठरेल. पण लोभाने संपूर्णपणे ग्रासलेल्या जगात योग्य कृती कशी होईल? कारण, प्रत्येक देश फक्त आपल्या गरजांचाच विचार करीत आहे. पृथ्वीतलाला काय झेपेल ह्याचा विचारच कोणीच करीत नाही.

---

### अमेरिकेच्या बॉंबहल्ल्यांचा धि:कार

हॅनॉय नभोवाणीवरून बोलताना अमेरिकन नटी जेन फॉंडा हिने व्हिएटनामवर सध्या चालू असलेल्या अमेरिकेच्या बॉंबहल्ल्यांचा धि:कार केला आहे. अमेरिका केवळ लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांवरच हल्ले करीत आहे, असे सांगण्यात येत आहे. हॅनॉय ह्या राजधानीच्या शहरापासून पूर्वेस ६० किलोमीटर असलेल्या भागात जेन फॉंडा गेली होती. ह्या भागात लष्करी दृष्ट्या हल्ला करण्यास योग्य असे एकही ठिकाण नसताना तेथील बांधबंदिस्तीच्या कामावर अमेरिकन विमानांनी बॉंबफेक केल्याचे तिला आढळून आले. अशी बॉंबफेक चुकून झाली असल्याच्या शक्यतेची कबुली अलीकडे अमेरिकेने दिली आहे.

---

### ट्रॅक्टर्सची देणगीदाखल आयात

परदेशातून देणगी म्हणून आयात करण्यास परवानगी असलेल्या योजनेची मुदत भारत सरकारने वाढविली आहे. ह्या योजनेप्रमाणे आता १९७३ च्या मार्चअखेर देणगीचे ट्रॅक्टर्स आयात करता येतील. ही योजना १९६८ सालापासून अमलात आहे. एका व्यक्तीला एकच ट्रॅक्टर आयात करता येतो आणि परदेशातील व्यक्तीला एकच ट्रॅक्टर पाठविता येतो. योजनेप्रमाणे ८ वेगवेगळ्या बनावटीचे ट्रॅक्टर्स आयात करता येतात. त्यासोबत देणगीदाखल देता येणाऱ्या शेतकी अवजारांची यादी तयार करण्यात आलेली आहे. त्यांपैकी एक अवजारही देणगीदाराला पाठविता येईल. जुन्या ट्रॅक्टर्सची आयात मात्र करता येत नाही. ट्रॅक्टरबरोबर मर्यादित प्रमाणात सुटे भागही आयात करता येतात.

---

### सरकार खाजगी वीज कंपन्या ताब्यात घेणार

मध्यवर्ती सरकारच्या पाणीपुरवठा व वीज खात्याच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीप्रमाणे खाजगी मालकीच्या वीजपुरवठा कंपन्या सरकार लवकरच आपल्या ताब्यात घेणार आहे. १३३ खाजगी मालकीच्या वीजपुरवठा कंपन्या आहेत. काही कंपन्या स्वतःच वीज उत्पादन करून वाटप करणाऱ्या आहेत, तर काही राज्य वीज मंडळाकडून वीज विकत घेऊन ग्राहकांना पुरविणाऱ्या आहेत. खाजगी कंपन्यांपैकी कलकत्ता, जमशेटपूर आणि अहमदाबाद येथील कंपन्या सर्वात मोठ्या आहेत. खाजगी कंपन्यांची एकूण उत्पादनक्षमता १४९६ मेगॅवॅट आहे. त्यांपैकी १३१३ मेगॅवॅट वीज वरील कंपन्या निर्माण करतात. देशातील वीज-उत्पादनापैकी १० टक्के उत्पादन खाजगी कंपन्या करतात.

# भारताच्या समाजवादी सरकारचे धोरण कसे असावयास हवे ?

## स्वातंत्र्याची २५ वर्षे : कार्यसिद्धी आणि अपयश

श्री. जे. आर. डी. टाटा

( दि टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. चे चेअरमन )

भारताच्या स्वातंत्र्यास यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. दुःखाची गोष्ट अशी की या पंचवीस वर्षांची सुरुवात आणि शेवट ही दोन्ही आपल्या या उपखंडातील फार मोठ्या राजकीय बदलानेच झाली असे नव्हे तर सुमारे एक कोटी लोकांवर भयाने घरदार सोडून निर्वासित होण्याची आलेली आपत्ती, हजारो लोकांना ओढवलेला मृत्यू व लाखो लोकांचे झालेले हाल आणि युद्ध हीही या काळाने पाहिली. आपल्या पंतप्रधान आणि पाकिस्तानचे अध्यक्ष यांच्यात नुकत्याच झालेल्या सिमला करारामुळे या दोन देशांतील हा दुःखद अध्याय आता कायमचा संपला आहे, आणि शांतता, वाढते सामंजस्य आणि सहकार्य ही यापुढे संघर्ष व झगडा यांची जागा घेतील. गेली २५ वर्षे यामुळे दोन्ही बाजूंचे अतोनात नुकसान झाले होते.

या २५ वर्षांपैकी शेवटच्या वर्षी भारतास निर्वासित-साहाय्याचे एवढे जबरदस्त ओझे सहन करावे लागले की जगात तेवढे कोणावरही पडले नसेल; त्यातून ७ कोटी लोकसंख्येच्या देशास स्वातंत्र्य मिळाले; एक विजयी युद्ध लढले गेले—सुदैवाने ते थोडक्यात संपले; या घटनांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेस बसलेले जबर तडाखे त्याने यशस्वीपणे सहन केले आणि आशियाई सत्ता-समतोलातील महत्त्वाचा घटक म्हणून भारत उभा राहिला. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली त्याने मोठ्या प्रमाणात राजकीय एकात्मता आणि स्थैर्य प्राप्त केले. स्वातंत्र्याच्या प्रारंभकाळात जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालीच ते शक्य झाले होते.

अशा महत्त्वाच्या प्रसंगी या घटनापूर्ण पंचवीस वर्षांतील आपल्या कार्यसिद्धीचा तसेच आपल्या अपयशांचा थोडक्यात आढावा घेणे योग्यच ठरेल.

### कार्यसिद्धी आणि...

राजकीयदृष्ट्या, आपण अनेक कसोट्यांतून आणि दिव्यातून एक अतिशय स्थिर व विकासमान देश म्हणून बाहेर पडलो असुन एक राष्ट्र व राजकीयदृष्ट्या समर्थ राष्ट्र म्हणून आपण उभे राहू की नाही अशी अनेकांना वाटणारी भीती वा आशा आपण फोल ठरवली आहे.

लष्करीदृष्ट्या, मानवी शक्तीच्या, सामग्रीच्या आणि उच्च दर्जाच्या तज्ज्ञांच्या बाबतीत आपण कार्यक्षमता प्राप्त केली आणि ती आपल्या संरक्षणविषयक गरजांच्या दृष्टीने निश्चित पुरेशी होती. अर्थात बड्या राष्ट्रांपासून नव्हे. तसेच आधुनिक लष्करी यंत्रसामग्रीच्या मोठ्या उत्पादनाबाबत आपल्याशी तुलनीय असा दुसरा विकासमान देश नाही.

आर्थिकदृष्ट्या, आपण धान्योत्पादनात दुपटीहून अधिक वाढ केली आहे, औद्योगिक उत्पादन तिपटीहून जास्त वाढवले आहे आणि आपले खरे दरडोई उत्पन्न २५ टक्क्यांनी वर गेले आहे. या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत ते वास्तविक खाली गेले होते. आपल्या लोकांचे आयुर्मानही ३१ वरून ५२ वर्षांवर गेले असून त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण १६.६% वरून २९% वर गेले.

### अपयश

या उल्लेखनीय कार्यसिद्धीमुळे आपण काहीसे संतुष्ट व्हायला प्रत्यवाय नाही. परन्तु आपल्या औद्योगिक सामग्रीची सगळी वाढ आणि आधुनिकीकरण लक्षात घेऊनही आजही आपण औद्योगिक दृष्ट्या जगात फार लहान आहोत, याकडे दुर्लक्ष करता येत नाही. जागतिक पोलाद उत्पादनापैकी फक्त एक टक्का उत्पादन आपण करतो. जागतिक निर्यातीत आपला वाटा फक्त अर्धा टक्का आहे आणि जपान महिन्याभरात जे उत्पादन करतो तेवढे आपण वर्षभरातही करीत नाही. १९५१ मध्ये आपण नियोजनास प्रारंभ केला तेव्हा आपण दरडोई वार्षिक उत्पन्नवाढीचे जे उद्दिष्ट ठेवले त्याच्या एकचतुर्थांशच वाढ होत आहे. आपले बहुसंख्य बांधव अपार दारिद्र्यात आणि हालअपेष्टांतच राहात आहेत. बेकारी आणि अर्धबेकारी वर्षानुवर्षे वाढतेच आहे आणि गेल्या २५ वर्षांत विकासकार्यासाठी ९५ हजार कोटी रुपये खर्चूनही बहुसंख्य जनतेचे जीवनमान जगात अत्यंत खालच्या दर्जाचेच आहे, या गोष्टीकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही.

शेवटी, महत्त्वाचे म्हणजे आपल्या लोकसंख्यावाढीस आपण खऱ्या अर्थाने आळा घालू शकलेलो नाही. गेल्या अवघ्या २५ वर्षांत ती २० कोटींनी वाढली आहे म्हणजे अमेरिका, पश्चिम युरोप आणि सोविएत रशिया यांच्या एकूण लोकसंख्येइतकी!

### यापुढील अनुकूल परिस्थिती

मात्र पुढे पाहता, येत्या २५ वर्षांबाबत आपण निराश होण्याचे वा खचून जाण्याचे कारण नाही. आता आपला वैविध्यपूर्ण औद्योगिक पाया तयार झाला आहे. वेगाने विस्ताराची क्षमता आपल्याकडे आहे. कार्यकौशल्य आणि व्यवस्थापन-कौशल्य यांचीही प्रगती असून आपली अर्थव्यवस्था आता भक्कम झाली आहे. त्यामुळे गेल्या वर्षातील जबर तडाखे तिने पचवले. तितकेच महत्त्वाचे हे की कणखर व धीट नेतृत्वाखालील एकात्म सरकार आता आपल्याला लाभलेले आहे. अशी सगळी अनुकूल परिस्थिती असताना पूर्वीपेक्षा अधिक वेगाने आपण प्रगतीची वाटचाल करू शकू यात शंका नाही.

आर्थिक प्रगतीला अर्थ यायचा असेल तर सामान्य माणसांना तिचा लाभ मिळाला पाहिजे ही जाणीव आपल्याकडे नुकतीच झाली आहे. तिचे स्वागत करतानाच मला हे नमूद करण्यास खेद होतो की, सध्याच्या आर्थिक धोरणामुळे वेगवान औद्योगिक प्रगतीस खीळ बसत आहे याची जाणीव अजूनही सरकारी वर्तुळात झालेली नाही. या वाढीतूनच आर्थिक व भौतिक साधनसामग्रीद्वारे मोठ्या प्रमाणावरील रोजगार आणि समाज-कल्याण योजनांची व गरिबीविरोधी कार्यक्रमाची अमलबजावणी शक्य होणार आहे.

### आर्थिक वाढीस नकाराचे धोरण

खाजगी क्षेत्रात आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण या विषयावर अती डाव्यांनी इतकी वर्षे जो जोरदार व यशस्वी प्रचार चालवला आहे त्या प्रभावाखाली सरकार अजूनही आहे. मॅनेजिंग एजन्सी पद्धत नष्ट करूनच सरकारचे समाधान झालेले नाही; तर बहुतेक व्यक्तिगत कंपन्यांना—त्यात पूर्वी मॅनेजिंग एजन्सी फर्म्सखाली असलेल्या छोट्या कंपन्याही आल्या—देशाच्या आर्थिक वाढीस हातभार लावण्यास नकार देण्याचे सर्वसाधारण धोरण सरकार अनुसरीत आहे. उत्कृष्ट कामगिरी असणाऱ्या कंपन्या अथवा कंपन्यांचे गट आणि गंभीर स्वरूपाचे गैरव्यवहार करणाऱ्या कंपन्या यांच्यात काहीही भेदभाव केला जात नाही. तथाकथित 'बड्या कंपन्या' या खाजगी क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात व प्रभावीपणे प्रतिनिधित्व करीत असल्याने या धोरणापायी नवीन औद्योगिक गुंतवणूक कमी झाली आणि परिणामी गेल्या दोन वर्षांत औद्योगिक वाढीत घट झाली. मात्र आता काही मोठ्या कंपन्यांतील साधनसामग्री आणि व्यवस्थापकीय सामग्री यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उपयोग करून घेण्याची पुन्हा तयारी होत असल्याची आशादायक चिन्हे आपल्या काही सहोदर कंपन्यांना अलीकडे मिळालेल्या परवान्यांमुळे व मनसुबा-पत्रांमुळे दिसू लागली आहेत.

### सर्व आर्थिक सत्ता सरकारकडे

मला असे वाटते की आर्थिक सत्तेचे खरे स्वरूप आणि मर्यादा याबद्दलच्या विचारात खरोखरी गोंधळ झालेला आहे. कारण त्या-बाबत बरीच भीती आणि संशय खरा व राजकीय दृष्ट्या सोईचा असा व्यक्त केला गेला आहे. प्रत्येक मोठ्या औद्योगिक हालचालीवर सरकारचे असलेले सर्वांगीण निर्बन्ध आणि नियंत्रण यात आता सरकारच्या मक्तेदारी संस्थांकडून होणाऱ्या व्यवस्था-पकीय नियंत्रणाचीही भर पडली आहे. त्याचा अर्थ आता खरी आर्थिक सत्ता औद्योगिक व्यवस्थापनाकडे राहिली नाही हा स्पष्ट आहे. 'आर्थिक सत्ता' याचा अर्थ स्वतःचे अर्थविषयक निर्णय स्वतः घेणे हा असेल तरच हे म्हणता येईल. काय व किती उत्पादन करावे, किमती काय ठेवाव्यात, कर्ज किती घ्यावे, किती शेअर्स आणि कोणत्या किमतीला विक्रीस काढावेत, वेतन आणि बोनस किती द्यावा, कोणते अधिकारी नेमावेत, त्यांना पगार किती द्यावा, आणि काही बाबतींत तर डिव्हिडंड किती वाटावा हे ठरविण्याचा अधिकार न राहिल्यामुळे संचालक आणि अध्यक्षां-सारख्या वरिष्ठ व्यवस्थापकांपासून तो खालपर्यंत कोणालाच या क्षेत्रात काही आर्थिक सत्ता राहिलेली नाही. माझे स्वतःचेच उदाहरण घ्यावयाचे झाले तर, मला आहेत त्यापेक्षा खरोखर कमी अधिकार असलेला एखाद्या औद्योगिक अधिकारी महत्त्वाच्या उद्योगधंद्याच्या प्रमुखपदी भारत सोडून जगात इतरत्र कुठे असेल काय याविषयी मला शंका आहे. खरे पाहता खरी आर्थिक सत्ता आपल्या हाती केंद्रित कशी होईल याची खबरदारी जगातील कोणत्याही सरकारने घेतलेली नाही.

### समाजवादी सरकारचे धोरण कसे पाहिजे ?

मला वाटते या गोंधळाचे खरे कारण जर कशात असेल तर ते म्हणजे व्यवस्थापकीय स्वातंत्र्य. उपक्रमशीलता व धोरण ठरविण्याचे अधिकार नष्ट करण्यासाठी अथवा ते कमी करण्या-साठी सरकार नियंत्रणे लादीत असताना खाजगी उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनेचे मुख्य फायदेच नष्ट केले जात आहेत. टीकेचा खरा आणि यथार्थ रोख असावयास पाहिजे होता तो आता बेकायदेशीरपणे गोळा केलेल्या विशेषतः भारतात आणि परदेशांतही कर चुकवून गोळा केलेल्या संपत्तीविरुद्ध. लाच-लुचपतीसारख्या समाजविरोधी कृत्यांसाठी तिचा जो वापर होतो त्याविरुद्ध माझ्या मते आमच्या सरकारसारख्या प्रचंड सत्ता हाती असलेल्या समाजवादी सरकारचे योग्य धोरण तेच ठरेल की जेणेकरून एका बाजूला संपत्तीचे केन्द्रीकरण करण्यावर, बेकायदा पैशाचा समाजविरोधी उपयोग करण्यावर, बंदी आणण्यासाठी शक्य तो सर्व उपाय योजणे आणि जे दोषी असतील त्यांना शिक्षा करणे आणि दुसऱ्या बाजूला राष्ट्र-उभारणीच्या कार्यासाठी सर्व साधनसंपत्ती, शक्ती खुली करणे आणि खाजगी क्षेत्रात ज्यांनी पूर्वी आपल्या कार्याने राष्ट्राचा विश्वास संपादन केला त्यांच्या निष्ठेचा उपयोग करून घेणे.

मला अजूनही आशा आहे, कदाचित ती व्यर्थही असेल, की एक ना एक दिवस सरकार हे धोरण स्वीकारील. कारण जास्तीत जास्त विकास आणि जास्तीत जास्त सामाजिक न्याय यासाठी उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग याच एकमेव धोरणामुळे करता येईल.

---

### माश्यांना मारणारा लैंगिक आकर्षणाचा सुगंध

अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी माश्या मारण्याचा एक नवा शोध लावला आहे. मादी माशी नराला आकृष्ट करण्यासाठी जो लैंगिक आकर्षणाचा सुगंध सोडते, तसाच सुगंध रसायनशाळेत तयार करण्यात आला आहे. हा सुगंधी अर्क पसरलेला कागद अडकवून ठेवला, म्हणजे माशी नर त्यावर तुटून पडतात आणि त्यांना मादीऐवजी मृत्यूला कवटाळावे लागते. नर मेले म्हणजे माद्या काही एकट्या प्रजावाढ करू शकत नाहीत.

## जगातील सर्वांत लांब पूल गंगेवर होणार

बिहार राज्यात हाजीपूर ह्या ठिकाणी गंगेवर बांधण्यात येत असलेल्या पुलाच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले. नदीवर बांधण्यात आलेला हा जगातील सर्वांत लांब पूल होणार आहे. बिहार राज्याची विभागणी गंगेने उत्तर बिहार व दक्षिण बिहार भागात केली आहे. पण ह्या दोन्ही भागांना जोडणारा दुवा मात्र अस्तित्वात नव्हता. तसे पाहिले तर ह्या पुलाची कल्पना १९०७ साली पुढे आली होती. परंतु ती प्रत्यक्षात उतरण्यास इतका कालावधी लागला. पुलाची लांबी ५,५७५ मीटर होईल आणि त्यासाठी ४६ कमानी बांधाव्या लागतील. दोन कमानीतील अंतर १२१ मीटर असेल. पुलाचा खर्च मध्यवर्ती सरकार राष्ट्रीय हमरस्त्यांबाबतच्या योजनेखाली करणार आहे. पूल पुरा झाल्यावर पाटण्यापासून काटमांडूला रस्त्याने जाता येईल. बिहार राज्यात वारंवार दुष्काळ पडतात. उत्तर बिहारमध्ये राज्यातील अन्नधान्याच्या उत्पादनापैकी ६५ टक्के अन्नधान्य पिकविण्यात येते. परंतु दळणवळणाच्या चांगल्या सोयी नसल्यामुळे तेथील धान्य दक्षिण बिहारमध्ये आणणे अशक्य होते. अर्थातच दक्षिण बिहारला दुष्काळाचे फटके अधिक प्रमाणात बसतात. दक्षिण बिहार खनिज संपत्तीच्या उत्पादनात भारतात अग्रेसर आहे. खनिजांच्या एकूण उत्पादनापैकी ४८ टक्के उत्पादन दक्षिण बिहारमध्ये होते. बिहार राज्य मागासलेले गणले जाते. तेथील दरडोई उत्पन्न सरासरी ४०२ रुपये आहे तर अखिल भारतीय दरडोई उत्पन्नाची सरासरी ५२९ रुपये आहे.

---

## कॅनडाच्या विमान कंपनीला हिंदी बाजारपेठ ?

कॅनडातील डी हॅविलँड ही प्रसिद्ध विमान कंपनी भारतात आपली विमाने विकण्याची संधी पाहात आहे. कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे तिची दोन इंजिनांची विमाने ग्रामीण भागात वापरण्यास विशेष सोयीची आहेत. कारण ती कच्च्या धावपट्टीवरून उड्डाण करू शकतात व उतरूही शकतात. भारतात ग्रामीण भागात अनेक प्रेक्षणीय स्थळे विखुरलेली आहेत. परंतु तेथे जाण्यासाठी वाहनाच्या सोई नसतात. ही उणीव कंपनीची विमाने भरून काढू शकतील. एका विमानाची किंमत सुमारे ४० लाख रुपये आहे. त्यात २० प्रवासी बसण्याची सोय आहे. विमाने बळकट बांधणीची व चालू स्थितीत ठेवण्यास सुलभ आहेत. त्यांचा खर्चही बेताचा आहे. कंपनीची सध्या विमान-वाहतूक अधिकाऱ्यांशी बोलणी चालू आहेत.

---

## ३० लाखांचा परदेशी माल पकडला

कलकत्त्याच्या विमानतळावर कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी ३० लाख रुपये किमतीचा परदेशी बनावटीचा माल पकडला आहे. मालात मुख्यत: घड्याळे होती. हा माल एअर इंडिआच्या विमानातून हाँगकाँग येथील एका माणसाने पाठविला होता. माल घेणाराचे नाव म्हणून एका परदेशी प्रतिनिधीच्या कचेरीचा निर्देश करण्यात आला होता. परदेशी कचेरीने हा माल आपला नसल्याचे अर्थातच जाहीर केले. ३०० किलोग्रॅम वजनाच्या दोन पेट्या राजप्रतिनिधीचा माल म्हणून पाठविण्यात आल्या होत्या. आत पुस्तके आहेत असे नमूद करण्यात आले होते. राजप्रतिनिधीचा माल तपासणी न होता सामान्यत: सोडण्यात येत असतो.

---

## जपानी वृद्धांना मोफत प्रवास

वृद्धांचे जीवन सुखी कसे करता येईल हा एक चिंतेचा विषय आहे. अमेरिकेसारख्या देशात वृद्ध आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असले तरी त्यांचे जीवन एकाकी असते. भारतात वृद्धाश्रमाच्या कल्पनेने अद्याप व्यावहारिक मूळ धरलेले नाही. दरम्यान जपानच्या टोकिओमधील वृद्धांना सरकारी वाहनातून मोफत प्रवास करण्यासाठी खास परवाने देण्यात येणार आहेत. मात्र अशा वृद्धांचे वय ७० च्या पुढे असले पाहिजे. वृद्धांना मदत करण्याच्या बुद्धीने हा उपक्रम करण्यात येत आहे. टोकिओ शहरात सध्या सत्तरीच्या पुढे गेलेले ३ लाख, ६० हजार वृद्ध आहेत. त्यांना पास मिळतील; पण तरुण त्यांना वाहनात नीट चढू देतील का ?

---

## गुलामांचा चोरटा व्यापार अजूनही चालू

१९ व्या शतकात युरोपिअन व्यापारी आणि त्यांचे अरब सहकारी ह्यांनी आफ्रिकेतील लोक गुलाम म्हणून विकून अगणित पैसा कमावला. आता आफ्रिकेतील अनेक देश युरोपिअन लोकांच्या वसाहतशाहीतून मुक्त झाले आहेत. पण अजूनही आमिषे दाखवून तेथील लोकांना चोरट्या मार्गाने गुलाम म्हणून युरोपात आणले जाते. फ्रान्समधील एका रस्त्यावरून चहूबाजूंनी बंद असलेली एक लॉरी जात होती. काही यांत्रिक बिघाडामुळे ती थांबली. आसपासच्या पोलिसांना संशय आल्याने त्यांनी बंद गाडीचे दार उघडले. आणि काय आश्चर्य ! आत ५९ आफ्रिकन माणसे दाटीवाटीने कोंबलेली आढळली. त्यांना अतिशय तहान लागली होती आणि भुकेने ते व्याकूळ झालेले होते. ही माणसे अर्धवट बेशुद्धीत होती.

---

## बांगला देशाला ध्वनिप्रक्षेपक देणार

रशिआ आणि बांगला देश ह्यांच्या दरम्यान झालेल्या करारा-प्रमाणे बांगला देशाला रशिआ ८ ध्वनिप्रक्षेपक पुरविणार आहे. त्यांपैकी एक १ हजार किलोवॅट शक्तीचा मध्यमलहरी आणि एक १०० किलोवॅट शक्तीचा लघुलहरी असा असेल. त्यांच्या उभारणीचे काम रशिअन तज्ज्ञ करणार आहेत, प्रक्षेपकासाठी लागणारी सर्व साधने ढाका बंदरात पोचलेली आहेत. उभारणी-साठी सुमारे २० लाख रुबल्स खर्च येणार आहे. बांगला देश अस्तित्वात आल्यापासून त्याला अनेकविध परदेशीय प्रचाराला तोंड द्यावे लागते आहे. त्यासाठी लागणारी रेडिओंची साधने तेथे अपुरी होती. ही वाण आता भरून निघणार आहे.

---

BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT, *General Manager.*

K. B. KIRTIKAR, *Chairman.*

**ओगले**

**प्रभाकर कंदील**


◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओबड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर


मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )





**इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.**

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २१२

तार : lVwpijoay

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )